**निशाणी यु—७ पुढे चालू....** **अर्ज (ई. सी.) क्र. ९/सी—४/२०२१**

## शपथेवर उलटतपास वि. प. यांचेतर्फे विधीज्ञ श्री. ए. पी. चौगुले यांचेमार्फत

माझे शिक्षण इयत्ता बारावी झाले आहे. मी माझा अर्ज पुर्ण वाचला आहे. याकामी वि.प.ने दाखल केलेले म्हणणे व कागदपत्रे मी पाहिली आहेत. मी माझे शपथपत्र दाखल करण्यापूर्वी वि.प.यांचेविषयी माहिती घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की मयत राहुल हे वि.प.यांचेकडे कामास नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मयत राहुल वि.प.यांचेकडे कामास होता हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही.

हे म्हणणे खरे नाही की आता मला दाखविलेले निशाणी यु—३ सोबत अ.क्र. १ येथील प्रमाणपत्रावर वि.प.यांचे हस्ताक्षर व सही नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर कागदामध्ये वि.प. ही प्रोप्रायटरी फर्म आहे किंवा नाही याबाबत काही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की धनंजय पंडितराव भोसले हे धनंजय मेटल वर्क्सचे प्रोप्रायटर नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मयत राहुल ध्धनंजय पंडितराव भोसले अगर धनंजय मेटल वर्क्सचे कामगार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की धनंजय पंडितराव भोसले यांनी कधीही माझे पतीला कामगार म्हणून नेमणुक दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की दि. २८.१२.२०१९ रोजी धनंजय पंडितराव भोसले यांनी कोणतेही पत्र अगर प्रमाणपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की धनंजय मेटल वर्क्स ही फर्म दि. १३.१२.२०१० रोजी संपुष्टात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे धनंजय मेटल वर्क्सने गन मेटल आणि कास्टींग तयार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

हे म्हणणे खरे नाही की माझे पती राहुल यांना स्क्रॅप मटेरियलचे चांगले ज्ञान होते. हे म्हणणे खरे नाही की माझे पती सर्व कंपन्यांमध्ये फिरून स्क्रॅप मटेरियल गोळा करीत होते. हे म्हणणे खरे नाही की तसेच ते सर्व कंपन्यांना स्क्रॅप मटेरियल पुरविण्याचेही काम करीत होते. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०३.१०.२०२० रोजी माझे पतीने वि.प.यांचेकडे कोणतेही काम केलेले नाही. हे

<u>निशाणी यु—७ पुढे चालू....</u> <u>अर्ज (ई. सी.) क्र. ९/सी—४/२०२१</u>

म्हणणे खरे नाही की माझे पतीने स्क्रॅप मटेरियलचा पुरवठा केल्यानंतर ठरलेल्या किंमतीनुसार त्यांना पैसे दिले जात होते. हे म्हणणे खरे नाही की माझे पतीला धनंजय पंडितराव भोसले अगर धनंजय मेटल वर्क्स यांनी स्क्रॅप मटेरियल बदल्यात वेळोवेळी मोबदला दिला आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझे पती डिसेंबर २०१३ पासून वि. प.यांचेकडे काम करीत होते व त्यांना दरमहा रू. १४,०००/— पगार होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की दि. ०३.१०.२०२० रोजी माझे पती वि.प.यांचेकडे कामाला गेले होते हे दर्शविण्यासाठी माझे तोंडी शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर दिवशी अर्जदार क्र. ४ व ५ यांनी माझे पतीला वारंवार फोन केले हे दर्शविण्यासाठी माझे तोंडी शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दि. ०४.१०.२०२० रोजी अर्जदार क्र. ४ यांनी पुन्हा त्यांना मोबाईलवर फोन केला व तो फोन वि.प.यांनी उचलला हे दर्शविण्यासाठी माझे तोंडी शब्दाशिवाय कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. ०४.१०.२०२० रोजी वि.प.यांनी मला फोन केला हे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे आहे की दि. ०३.१०.२०२० रोजी माझे पती घरी आले नाहीत म्हणून मी ते हरविलेबाबतची तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पती यांचेवर सी.पी.आर. हॉस्पीटल आणि सावित्रीबाई फुले हॉस्पीटल येथे झालेल्या उपचाराबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर उपचाराचे कागद याकामी हजर करण्यास कसलीही अडचण नव्हती.

माझे पती दि. ०६.१०.२०२० रोजी सावित्रीबाई फुले हॉस्पीटलमध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की माझे पती दि. ०६.१०.२०२० रोजी IC BLID C Cardio Respiratory Failure या कारणामुळे मयत झाले. हे म्हणणे खरे

आहे की माझे पतीच्या मृत्यूचे कारण अर्जात आणि सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यास मला कसलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की १५ दिवसानंतर मी वि.प.यांना फोन केल्याचे खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे नाही की माझे अर्जातील परिच्छेद क्र. ६ मध्ये नमूद केलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की दि. ०३.१०.२०२० रोजीचे फोनमधील कॉल डिटेल्स डिलीट केले हे दर्शविणारा कोणताही पुरावा याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पती मयत झालेबाबत हॉस्पीटलमधील कागदपत्रे याकामी दाखल करण्यास मला कसलीही अडचण नव्हती.

हे म्हणणे खरे नाही की माझे पतीशी पटत नसल्याने मी मुलांसोबत माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत: हॉटेल व्यवसाय करते. हे म्हणणे खरे नाही की माझे पतीचा काम करताना अगर वि.प.यांच्या कामाच्या ठिकाणी कोणताही अपघात झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जात आणि सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात केलेली नुकसानभरपाईची मागणी पुर्णपणे चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार यांना वि.प.यांचेकडून नुकसानभरपाई मिळणेचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे अर्जातील आणि सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील संपुर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की नुकसानभरपाईची रक्कम मिळविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

**सही/—**

दिनांक:— ०६.०२.२०२३
कोल्हापूर

( ए. जी. बेहेरे )
आयुक्त, श्रमिक नुकसानभरपाई कायदा
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र.२, कोल्हापूर